स्वप्न ते नाही
जे तुम्ही झोपेत
बघता,
स्वप्न ते आहे जे
तुम्हाला झोपूच
देत नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार ९ मे २०२५ | अंक १४८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# भारत पाक युद्ध सुरू ! विमानतळ, ट्विटर बंद भारत पाकची कबर खोदणार




पाकिस्तानने भारताच्या सात शहरांना टार्गेट करण्याचा प्रयत्न केल्याने भारताने पाकिस्तानला करारा जवाब दिला आहे. भारताने पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादेत मोठा हल्ला केला आहे. तर लाहोर आणि कराचीत हल्ला करून पाकिस्तानला सळो की पळो करून सोडलं आहे. भारताच्या मिसाईल आणि ड्रोनचा आक्रमक मारा पाहून पाकिस्तानने अखेर संपूर्ण देशात ब्लॅक आऊट केला आहे. भारताने हल्ला केला तरी टार्गेटवर हल्ला होऊ नये म्हणू पाकिस्तानने हा निर्णय घेतला आहे. तर, दुसरीकडे पाकिस्तानविरुद्धचं युद्ध सुरू झाल्याने भारतानेही महत्त्वाचे निर्णय घेतले आहे.वॉर्निंग देऊनही पाकिस्तानने कुरापती सुरू ठेवल्याने भारताने अखेर पाकिस्तानवर हल्ला केला आहे. त्यामुळे भारत-पाकिस्तान युद्धाला सुरुवात झाला आहे. मिसाईल आणि ड्रोनने हल्ला केला जात आहे. त्यामुळे पाकिस्तानने अख्ख्या पाकिस्तानात ब्लॅकआऊट जारी केला आहे. तर भारताने सीमावर्ती भागात ब्लॅकआऊट केला आहे. पंजाब, अंबाला, राजस्थान आणि हरियाणातील गावांना ब्लॅक आऊट करण्यास सांगितलं आहे. तसेच सायरन वाजताच प्रतिसाद देऊन ब्लॅकआऊट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पंजाबमधील काही शाळा पूर्वीच बंद करण्याचा निर्णय घेतला होता. या शाळा आणि महाविद्यालय राज्यातील सीमावर्ती जिल्हे – फिरोजपूर, पठाणकोट, फाजिल्का, गुरदासपूर आणि अमृतसर – येथे स्थित आहेत. या शाळा पुढील आदेश येईपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. आता हा आदेश संपूर्ण पंजाब राज्यात लागू करण्यात आला आहे. याशिवाय, काश्मीरमधील स्कूल एज्युकेशन डायरेक्टर यांनीही काही जिल्ह्यांतील शाळांसाठी सुट्ट्यांचे आदेश दिले आहेत. यामध्ये कठुआ, बारामुला, कुपवाडा, श्रीनगर आणि अवंतीपोरा येथील शाळांचा समावेश आहे. हे आदेश 9 आणि 10 मेसाठी लागू होते, मात्र आता संपूर्ण प्रदेशात लागू करण्यात आले

## कराची बंदरापासून इस्लामाबादपर्यंत:भारताच्या प्रतिहल्ल्यामुळे संपूर्ण पाकिस्तान हादरला

भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर चवताळलेल्या पाकिस्तानकडून भारतावर अयशस्वी हल्ल्याच्या प्रयत्न केला जात आहे. परंतु भारतीय लष्कराने पाकिस्तानला जोरदार उत्तर दिले आहे. भारताच्या ऑपरेशन सिंदूरमुळे चिडलेल्या पाकिस्तानने ८ आणि ९ मे च्या रात्री सीमेपलीकडून रात्रभर गोळीबार केला. क्षेपणास्त्र डागण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानचे सात क्षेपणास्त्र भारताने पाडले आहे. भारतीय लष्कराने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले आहे. गुरुवारी संध्याकाळी जम्मूच्या सीमावर्ती भागात पाकिस्तानने डागलेले किमान आठ क्षेपणास्त्रे भारताच्या संरक्षण यंत्रणेने हवेत यशस्वीरित्या पाडली. दुसरीकडे भारतीय नौदलाने सागरी आघाडीवर पाकिस्तानला जोरदार उत्तर दिले आहे. भारताने पाकिस्तानच्या कराची बंदराला लक्ष्य करून सर्जिकल स्ट्राईकपेक्षाही मोठी कारवाई केली आहे. त्यामुळे कराची बंदराचे मोठे नुकसान झाले आहे. भारतीय नौदलाने रात्रीच्या अंधारात कराची बंदरावर गुप्तपणे



हल्ला केला. बंदरावर तैनात असलेल्या पाकिस्तानी नौदलाला सावरण्याची संधीही मिळाली नाही. भारताने एकामागून एक अनेक क्षेपणास्त्रे, टॉर्पेडो आणि ड्रोन हल्ल्यांद्वारे कराची बंदराचे मोठे नुकसान केले. भारतीय नौदलाच्या हल्ल्याचा केंद्रबिंदू केवळ आर्थिक पायाभूत सुविधांवर नव्हता, तर पाकिस्तानी नौदलाची जहाजे, शस्त्रास्त्रे डेपो आणि टेहाळणी करणारी केंद्रे देखील पूर्णपणे उद्ध्वस्त केली आहे. कराची बंदर हे पाकिस्तान नौदलाचा कणा मानले जाते आणि त्यावरील हा हल्ला त्यांच्या सामरिक सामर्थ्याला थेट आव्हान देतो.

### 27 विमानतळे बंद

भारताने खबरदारीचा उपाय म्हणून देशातील एकूण 27 विमानतळे बंद केली आहेत. पाकिस्तानमधील विमानतळेही बंद झाली आहेत. त्यामुळे दोन्ही देशातील विमानतळांवर विमानांची प्रचंड गर्दी झाली आहे.

### संपूर्ण पंजाबात आदेश

भारत आणि पाकिस्तान यांच्यात अनेक किलोमीटर लांब सीमा आहे. पंजाब राज्यातून ही सीमा सुमारे 532 किमी आहे, राजस्थानातून 1070 किमी तर गुजरातमधून 506 किमी लांब आहे. याशिवाय, पश्चिम बंगालची सीमा बांग्लादेशसोबत 2,217 किलोमीटर लांब आहे.

### ट्विटर अकाऊंट बंद

पाकिस्तानकडून युद्धाच्या बाबत चुकीच्या बातम्या पसरवल्या जाऊ नये, चुकीची माहिती दिली जाऊ नये म्हणून भारताने एकूण 8 हजार ट्विटर खाती बंद केली आहेत. पुढील आदेश येईलपर्यंत ही खाती बंद राहणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

### शाळा बंद, सुट्ट्या रद्द

तसेच पंजाब, हरियाणा, गुजरात, राजस्थान आणि पश्चिम बंगालने मोठा निर्णय घेतला आहे. या ठिकाणच्या सरकारी अधिकारी, पोलिसांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच या भागातील शाळांना पुढील आदेशापर्यंत सुट्ट्या देण्यात आल्या आहेत.

## अमेरिकेचा भारताला पाठिंबा, भारतावर हल्ला केला तर.., पाकिस्तानला दिला थेट इशारा

मोठी बातमी समोर येत आहे, ऑपरेश सिंदूरनंतर पाकिस्तानकडून भारतावर हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला होता, आज सकाळी भारताकडून पाकिस्तानच्या या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्यात आलं आहे. भारतानं पाकिस्तानच्या 15 शहरांवर 50 ड्रोन हल्ले केले, या हल्ल्यामध्ये पाकिस्तानची रडार सिस्टीम पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे, मात्र तरी देखील पाकिस्तानकडून कुरापती सुरूच आहेत, पुन्हा एकदा आता पाकिस्तानकडून भारतावर हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र भारताच्या डिफेंस सिस्टमनं हे हल्ले परतून लावले आहेत. पाकिस्तानच्या आठ मिसाईल पाडण्यात आल्या असून, अनेक ड्रोन देखील पाडण्यात आले आहेत.त्यानंतर भारतानं या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी पाकिस्तानवर हल्ला केला आहे, लाहोरवर ड्रोन हल्ला करण्यात आला आहे. पाकिस्तान आणि भारतामधील तणाव प्रचंड वाढला असून, याचदरम्यान एक मोठी बातमी समोर आली आहे, अमेरिकेनं भारताला पाठिंबा दिला आहे. दहशतवाद्याच्या विरोधात आम्ही भारतासोबत आहोत, कोणत्याही कृतीला उत्तर दिलं जाईल अशी भूमिका अमेरिकेनं आता घेतली आहे, याबाबत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी ट्विट करत माहिती दिली आहे, तसेच अमेरिकेकडून पाकिस्तानला युद्ध न करण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे. युद्ध करू नका असं अमेरिकेनं म्हटलं आहे.पाकिस्तानकडून हल्ल्याचा प्रयत्न दरम्यान पाकिस्तानकडून पुन्हा एकदा भारतावर आज हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला, भाराताच्या सीमेला लागून असलेले शहर टार्गेट करण्याचा प्रयत्न होता. मात्र भारतानं पाकिस्तानचा हा हल्ला परतून लावला आहे. पाकिस्तानचे आठ मिसाईल आणि अनेक ड्रोन पाडण्यात आले आहोत. पाकिस्ताननं भारताचे तीन राज्य पंजाब, राजस्थान आणि जम्मू काश्मीरमध्ये हल्ला करण्याचा



प्रयत्न केला. जम्मू विद्यापीठ आणि विमानतळ पाकिस्तानच्या रडारवर होते. मात्र भारताच्या डिफेंस सिस्टमने हा हल्ला परतून लावला आहे, त्यानंतर आता भारतानं पाकिस्ताच्या लाहोरवर हल्ला केला आहे. पाकिस्ताननं पुन्हा केलेल्या हल्ल्याच्या प्रयत्नानंतर भारतानं अमेरिकेसोबत चर्चा केली, यावेळी आम्ही दहशतवादाविरोधात भारतासोबत असल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे.

## लाहोरवर भारतीय सैन्याचा मोठा हल्ला

मागच्या दोन दिवसात भारताने पाकिस्तानात घुसून हल्ले केले. भारताची कारवाई फक्त दहशतवादी आणि त्यांच्या अड्डयांविरोधात होती. पण नेहमीच दहशतवादाला आश्रय देणाऱ्या, त्यांचं पालन पोषण करणाऱ्या पाकिस्तानने भारतावर प्रतिहल्ला केला आहे. जम्मू-काश्मीरसह भारताच्या वेगवेगळ्या राज्यात पाकिस्तानने हवाई हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. आधीपासून सुसज्ज असलेल्या भारतीय सैन्य दलांनी पाकिस्तानचा हा प्रयत्न उधळून लावला. भारताच्या S-400 सिस्टिमने पाकिस्तानची सर्व मिसाईल्स, ड्रोन्स आणि फायटर जेट्स पाडली आहेत. आता कुठे काय घडतय ते 10 पॉइंट्समध्ये समजून घ्या कुठल्याही हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देणार,



भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी ठणकावून सांगितलं आहे. पाकिस्तानी सैन्याच्या हल्ल्यात काहीही नुकसान झालेलं नाही असं भारतीय सैन्याकडून सांगण्यात आलं आहे. भारताने पाकिस्तानवर मोठा हल्ला केला आहे. भारतीय सैन्याने लाहोरमध्ये हल्ले सुरु केले आहेत. भारताने लाहोरवर फक्त ड्रोन्सच नाही, तर मिसाइल्स सुद्धा डागल्याची माहिती आहे. भारताने पाकिस्तानचं एअरबॉर्न वार्निंग अँड कंट्रोल सिस्टम (AWACS) पंजाब प्रांतामध्ये पाडलं आहे. पठाणकोट आणि राजौरीमध्ये दहशतवाद्यांनी आत्महघातकी हल्ल्याचा प्रयत्न केल्याच वृत्त चुकीच आहे, असं लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. भारतीय सैन्याच्या अत्याधुनिक S-400 मिसाइल डिफेंस सिस्टिमने पाकिस्तानकडून डागण्यात आलेली 8 मिसाईल्स हवेतच नष्ट केली. पाकिस्तानने पुन्हा एकदा हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे दोन JF- 17 आणि F-16 फायटर जेट पाडल्याची माहिती आहे. पंजाबच्या बॉर्डर भागा ब्लॅकआऊट करण्यात आला आहे. अमृतसरमध्ये रात्री 9 ते सकाळी 5 वाजेपर्यंत ब्लॅकआऊट असणार आहे. पाकिस्तानने गुरुवारी जम्मू येथील एअरस्ट्रिपवर रॉकेट डागले. पण भारतीय सैन्याची सतर्कता आणि ताकतवर एअर डिफेन्स प्रणालीने पाकिस्तानचा हा हल्ला यशस्वी होऊ दिला नाही. पाकिस्तानने स्वस्तातल्या रॉकेट्सनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे. हमास स्टाइलने हल्ल्याचा प्रयत्न केला आहे.

## पाकिस्तान घाबरला, संपूर्ण देशात ब्लॅक आऊट; लाहोर, कराची, रावळिपंडी, बहावलरपूरपर्यंत भारत घुसला

पाकिस्तानच्या कुरापती आज दिवसभरही सुरूच राहिल्याने भारताने आज पाकिस्तानवर जोरदार हल्ला केला आहे. भारताने थोड्याच वेळापूर्वी पाकिस्तानच्या हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर देताना लाहोर, कराची, रावळपिंडी, सियालकोट आणि बहावलपूरपर्यंत हल्ला चढवला आहे. भारताने पाकिस्तानच्या एकूण सात शहरांवर हल्ला चढवला आहे. त्यामुळे पाकिस्तान चांगलाच घाबरला असून भारताने अधिक हल्ला करू नये म्हणून पाकिस्तान सरकारने अख्ख्या देशातच ब्लॅक आऊट केलं आहे. अचानक उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे पाकिस्तानी नागरिक प्रचंड हादरले आहेत. पाकमध्ये एकच खळबळ उडाली आहे. भारताने लाहोरवर मोठा हल्ला केला आहे. ड्रोन आणि मिसाईलद्वारे हा हल्ला करण्यात आला आहे. भारताने लाहोरसह सियालकोट, इस्लामाबाद, रावळपिंडी आणि बहावलपूरमध्ये जोरदार हल्ला केला आहे. भारताच्या या आक्रमक हल्ल्यामुळे पाकिस्तानमध्ये एकच खळबळ उडाली आहे. त्या आधी पाकिस्तानने भारताच्या काही भागात हल्ला केला होता. त्यामुळे भारताने जशास तसं उत्तर म्हणून पाकिस्तानवर हा हल्ला चढवला आहे. सात शहरांवर हल्ले भारताने आतापर्यंत पाकिस्तानचे चार विमानं पाडली आहेत. ही चारही लढाऊ विमाने आहेत. भारताने पाकिस्तानचं एअरबोर्न वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टिम पंजाब प्रांतात पाडलं आहे. पाकिस्तानने हल्ला केल्यानंतर राजस्थानातून फायटर विमान उडाले. जम्मू-काश्मीर हायवेवर जोरदार धमाके झाल्याचं ऐकायला आले. तर उरी सेक्टरमध्ये फायरिंग झाली. पाकिस्तानने भारताची सात शहरं टार्गेट केली होती. त्यामुळेच भारतानेही पाकिस्तानच्या सात शहरांवर ताबडतोब हल्ले केल्ले

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ९ मे २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### निवडणुका चार महिन्यात घेण्याचे आदेश

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचा आदेश देऊन सर्वोच्च न्यायालयाने एका अर्थाने गेली तीन ते पाच वर्षे निपचित पडलेल्या स्थानिक लोकशाहीला पुन्हा जागे केले आहे. या आदेशामुळे राज्यातील २९ महापालिका, २६ जिल्हा परिषदा, २८९ पंचायत समित्या आणि २५७ नगरपालिकांमधील ङ्गप्रशासक राजफ संपुष्टात येऊन, स्थानिक कारभार लोकप्रतिनिधींच्या हाती येणार आहे. या संदर्भातील खटल्यांमध्ये महत्त्वाचा मुद्दा असलेल्या इतर मागासवर्गाच्या (ओबीसी) आरक्षणाबाबतही सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे, आधीच्या २७ टक्के आरक्षणासह या निवडणुका होणार आहेत. मात्र, ओबीसी आरक्षणाबाबतची सुनावणी सुरूच राहणार असून, त्यासाठी निवडणुका लांबणीवर टाकण्याची गरज नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे निवडून येणाऱ्या ङ्गओबीसीफ लोकप्रतिनिधींचे भवितव्य त्या खटल्याच्या अंतिम निकालाच्या अधिन असेल. येत्या चार आठवड्यांत निवडणुकांची अधिसूचना काढावी आणि चार महिन्यांत प्रक्रिया पूर्ण व्हावी, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. त्यामुळे अपवाद वगळता जवळपास संपूर्ण राज्याला पडलेल्या नोकरशाहीच्या विळख्यातून सुटका होऊन गावे आणि शहरांच्या विकासाचे चक्र सुरू होईल, अशी आशा आहे. ङ्गघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण होणे आवश्यक आहे,फ अशी टिप्पणी न्यायालयाने केली असली, तरी या विषयावरील सर्वाधिक कालापव्यय न्यायालयीन प्रक्रियेतच झाला, ही वस्तुस्थिती आहे. करोना साथरोगाच्या काळात या निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या. पाठोपाठ ङ्गओबीसीफ आरक्षणाचा पेच उभा राहिला. नागपूर, अकोला, भंडारा आणि वाशीम या जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जाती-जमाती आणि ङ्गओबीसीफ आरक्षणाने घटनेने घालून दिलेली ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्यामुळे, ङ्गओबीसीफ आरक्षण वगळण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने हे आरक्षण कायम ठेवण्याबाबत केलेली याचिकाही फेटाळून, याबाबत शास्त्रशुद्ध माहिती सादर करण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता.दरम्यान, राज्य सरकारने याबाबत स्थापन केलेल्या बांठिया आयोगाने याबाबतचा अहवाल सादर केला. मात्र, त्यातून ङ्गओबीसींफ्च्या सुमारे ३४ हजार जागा कमी होत असल्याचा आक्षेप न्यायालयात घेण्यात आला. आता बांठिया आयोगाच्या शिफारशीपूर्व तरतुदीनुसार, म्हणजेच सन २०२२च्या स्थितीतील २७ टक्के ओबीसीफ आरक्षणासह या निवडणुका घेण्याचा आदेश देण्यात आल्याने सध्या तरी ङ्गओबीसींफ्चे प्रतिनिधित्व कायम राहणार आहे. केंद्र सरकारने केलेल्या घोषणेनुसार जातनिहाय जनगणना झाल्यानंतर, अनेक राज्यांतील या संदर्भातील प्रश्न सुटू शकतात. मात्र, महाविकास आघाडी सरकारने मु ंबईतील प्रभागांची संख्या वाढविण्याच्या विरोधातही एक याचिका सादर झाली होती. पुण्यातही काही गावे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाल्याने, प्रभागांची नव्याने रचना करावी लागणार आहे. ठिकठिकाणची प्रभागरचना, प्रभागांची म्हणजेच सदस्यांची संख्या किती असेल; तसेच ही प्रक्रिया राज्य सरकारच्या अधिपत्याखाली होणार की राज्य निवडणूक आयोगाच्या, या बाबतीतील चित्र स्पष्ट नाही. अपवादात्मक परिस्थितीत वेळ वाढवून मागण्याचाही पर्याय सरकारपुढे खुला आहे. स्थानिक निवडणुकांची चाहूल लागल्याने कोशात गेलेल्या माजी आणि भावी लोकप्रतिनिधींमध्ये उत्साहाचे भरते आले नसेल, तरच नवल! विधानसभेची निवडणूक महायुतीने भरभक्कम जनादेशाने जिंकल्यानंतर भारतीय जनता पक्षाला सध्याची स्थिती अनुकूल वाटत असल्याने, सरकारनेही न्यायालयीन गुंता सोडविण्याची भूमिका घेतली, हे उघड आहे. सरकारला जड झालेल्या ङ्गलाडकी बहीणफ्सारख्या योजना निवडणुकीपर्यंत नक्कीच रेटल्या जातील. सत्ताधाऱ्यांमधील धुसफूस लक्षात घेता महायुती एकत्र निवडणूक लढविणार की स्वतंत्र, याबाबत स्पष्टता नाही. महाविकास आघाडीतही तीच स्थिती आहे. शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र येणार का आणि आघाडीचे काय होणार, ही उत्सुकतेची बाब आहे. सत्ताधारी भाजपलाही इच्छुकांच्या मोठ्या भाऊगर्दीतून उमेदवार निवड आणि इतरांच्या नाराजीतून मार्ग काढावा लागेल; तसेच एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रे स काय करणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल

# कथा -आनंद जीवनाचा

आनंद आणि प्राजक्ताचे लग्न मोठ्या थाटामाटात साजरे झाले.प्राजक्ताचे सासर आणि माहेर एकाच गावात होते. प्राजक्ता दिसायला सुंदर आणि नोकरी करणारी होती.तिला तिच्या आईवडिलांनी शिकवून तिला तिच्या पायावर उभे केले होते.आनंदही दिसायला देखणा होता.एका चांगल्या कंपनीत मोठ्या पदावर होता.त्यामुळे जेव्हा प्राजक्ताला आनंदचे स्थळ सांगून आले तेव्हा तिच्या बाबांनी लगेच पसंती दर्शवली होती.प्राजक्तालाही आनंद मनोमन खूप आवडला होता.आनंद आणि प्राजक्ताच्या लग्नानंतर त्यांची वरात निघून गेली.आता संध्याकाळ झाली होती.वधूपक्षाकडील मंडळींना एका तासात हॉल रिकामा करून द्यायचा होता. त्यामुळे मुलीकडच्या पाहुण्यांनी आपापल्या खोल्यांमध्ये जाऊन सामानाची आवराआवर करायला सुरुवात केली.त्यानंतर वधूकडील मंडळी एकेक करून जायला निघाली.त्यावेळी प्राजक्ताच्या आईने अगदी जवळच्या असणाऱ्या पाहुण्यांना भेटवस्तू आणि मिठाई देऊन त्यांची रवानगी केली.आता लग्नाचा हॉल पूर्णपणे रिकामा झाला होता.आतापर्यंत लग्नाच्या कामात व्यस्त असल्यामुळे प्राजक्ताच्या आईवडिलांना एकटेपणा जाणवला नाही.परंतु आता सगळे पाहुणे मंडळी निघून गेल्यावर त्यांना एकटं वाटू लागलं.प्राजक्ताचे वडील तिच्या आठवणीने सारखे रडत होते.तिच्या आईने मात्र



डोळ्यांत एक टिपूसही आणला नाही.कारण तिला माहित होतं की ती जर रडायला लागली तर प्राजक्ताच्या बाबांना सांभाळणं कठीण जाईल.

सर्व लोक निघून गेले होते.आता फक्त प्राजक्ताच्या वडिलांचे अगदी जवळचे मित्र त्यांच्यासोबत होते.त्यांची गाडी रात्री दहा वाजता असल्याने ते दांपत्य प्राजक्ताच्या वडिलांच्या घरी काही वेळासाठी त्यांच्यासोबत कारने आले.घरी आल्यावर थोडावेळ सर्वांनी आराम केला. आराम झाल्यावर प्राजक्ताच्या आईने थोडं नाश्त्याचं त्यांच्या प्रवासाकरीता बांधून दिलं. सर्वांनी चहा घेतला.आता गाडीला फक्त एक तास उरला होता.प्राजक्ताचे वडील त्यांच्या मित्राला सपत्नीक रेल्वे स्टेशनवर सोडायला गेले.त्यांना रेल्वे स्टेशनवर सोडून आणि मित्राचा निरोप घेऊन घरी आले.घरी पोहचताच त्यांच्या मोबाईलवर प्राजक्ताच्या सास-यांचा व्हिडिओ कॉल आला. प्राजक्ताच्या आईवडिलांना आश्चर्य वाटले.तिकडून प्राजक्ताचे सासरे बोलत होते -''नमस्कार.काही नाही हो.आम्ही घरी पोहचलो. एक गोष्ट तुम्हाला सांगायला व्हिडिओ कॉल केलाय.तुमची मुलगी खूप समजूतदार आहे. बघा ना, दोन दिवसानंतर खरं तर नवीन जोडप्याला हनीमूनला जायचं आहे.पण तुमची मुलगी म्हणते की फिरायला खूप आयुष्य पडलं आहे.पहिले मला माझ्या सासरच्या लोकांना समजून घ्यायचं आहे.तिला आमच्यासोबत वेळ घालवायचा आहे.छान-छान पदार्थ बनवून आम्हाला खाऊ घालायचे आहेत. आता तर आनंदने सुध्दा तिच्या होत हो केलं आहे.खरंच इतकी चांगली सून मिळायला आम्ही नक्कीच काहीतरी पुण्य केलं असणार.'' प्राजक्ताच्या सास-यांनी तिचे केलेले कौतुक ऐकून तिच्या आईवडिलांच्या चेह-यावर एक तेज पसरले.त्यांची मुलगी इतकी समजूतदारपणे वागते आहे याचे त्यांना खूप कौतुक वाटले आणि आनंदही झाला.प्राजक्ताचे सासरे पुढे म्हणाले,''हे बघा, आम्ही प्राजक्ताचे म्हणणे तेव्हाच मान्य करू जेव्हा तुम्ही दोघे काही दिवसांसाठी आमच्याकडे रहायला याल.''आता प्राजक्ताच्या आईवडिलांना यावर काय बोलावे काहीच सुचत नव्हते.इतक्यात व्हिडिओ कॉलवर आनंद स्वतः आला आणि तो प्राजक्ताच्या बाबांना म्हणाला,''आई-बाबा, तुम्ही कसला विचार करताय? अहो हे तुमच्या मुलीचे सासर आहे. म्हणजेच तुमचेही घर नाही का? मला माहित आहे की आताच आमचे लग्न झाले आणि लगेच कसं काय मुलीच्या सासरी रहायला जायचं असा विचार मनात येतो आहे. असा विचार अजिबात करू नका.तुम्ही जसे प्राजक्ताचे आईबाबा आहात तसे आता माझे सुध्दा आहातच की.'' प्राजक्ताच्या सासरच्या मंडळींकडून इतकं प्रेमाने आमंत्रण मिळाल्याने तिच्या आईबाबांनी आनंदला त्यांच्याकडे काही दिवसांसाठी येण्याची हमी भरली.आनंद प्राजक्ताच्या आईवडिलांना म्हणाला,'' तुम्ही दोघेही उद्या तयार रहा.मी येतो तुम्हाला घ्यायला.'' असे म्हणत आनंदने व्हिडिओ कॉल बंद केला.

प्राजक्ताच्या आईबाबांच्या चेह-यावर आनंदाश्रू ओघळू लागले. त्यांनी कधी विचारही केला नव्हता की त्यांच्या मुलीला एव्हढं चांगलं सासर मिळेल. आनंदचेही त्यांना खूप कौतुक वाटत होते.त्यांना आता भरून पावल्यासारखे वाटू लागले. प्राजक्ताने जेव्हा आनंदचा तिच्या आईबाबांसोबत झालेला संवाद ऐकला तेव्हा तिच्या डोळ्यांत सुखाश्रू तरळले.इतकं छान सासर मिळाल्याने ती स्वतःला जगातील सर्वात भाग्यशाली महिला समजत होती.

**लैलेशा भुरे**
**नागपूर**

## नाळवंडीची लेक शेतात राबली,अभ्यासात चमकली प्रियंका काकडे हिचे प्रथम क्रमांक घेऊन बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश

पाटोदा (प्रतिनिधी) प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, शेतात आई-वडिलांना मदत करत आणि अभ्यासात सातत्य राखत जानपीर म ाध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नाळवंडी कारेगाव येथील कु. प्रियंका प्रकाश काकडे हिने बारावीच्या परीक्षेत ८८.३३ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिचे हे यश खरोखरच प्रेरणादायी आहे.प्रियंका ही शेतकरी कुटुंबातील असून, वडील शेतात कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. शाळा आणि अभ्यासाच्या वेळेशिवाय प्रियंका नियमितपणे शेतकामात हातभार लावत होती. मात्र, या साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडून तिने अभ्यासातही उत्कृष्ट कामगिरी केली आहे.शाळेचे मुख्याध्यापक म्हणाले, ङ्गप्रियंका हिचे यश मेहनतीचा आणि चिकाटीचा उत्तम नमुना आहे. ती खरोखरच इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरली आहे.ङ्ग प्रियंका भविष्यात सामाजिक



शास्त्राच्या माध्यमातून उच्च शिक्षण घेऊन समाजसेवेची दिशा घेण्याचे स्वप्न पाहते. तिच्या या यशामुळे गावकरी, शाळेतील शिक्षक, पालकांत आनंदाचे वातावरण असून,सर्वत्र तिच्या कौतुकाचा वर्षाव होत असुन बीड जिल्हा अनुलोमच्या वतीने तिचे विशेष अभिनंदन करण्यात आले

# भारत-पाकिस्तान प्रकरणात अमेरिकेची भूमिका काय ? उपराष्ट्रपती जेडी व्हेंस यांनी केल स्पष्ट

जम्मू-काश्मीरमध्ये फिरायला आलेल्या निष्पाप पर्यटकांना दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये लक्ष्य करत त्यांना ठार मारलं. 22 एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यात 26 जणांचा हकनाक बळी गेला. त्यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवत पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर मिसाईल्स डागत 100 दहशतवाद्यांचा खात्मा केला. मात्र या कारवाईनंतर दोन्ही देशांमधील तणाव प्रचंड वाढला असून पाकिस्तानच्या कुरापती अद्याप कायम आहेत. पाकिस्ताने भारतातील अनेक शहरांवर ड्रोन आणि मिसाईल हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र भारताच्या कुशल एअर डिफेन्स सिस्टीमने तो हाणून पाडला. दोन्ही देशांतील सध्याच्या स्थितीवर संपूर्ण जगाचं लक्ष आहे. याचदरम्यान अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हेन्स यांची महत्वाची प्रतिक्रिया समोर आली आहे. भारत-पाकिस्तान प्रकरणात अमेरिका दखल देणार नाही, आम्ही युद्धाच्या मध्ये पडणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. अमेरिका हा भारत-पाकला शस्त्र टाकण्यास सांगू शकत नाही, ते आमचं काम नाही,अमेरिकेचं त्याच्याशी काही घेणंदेणं नाही, असं जेडी व्हेन्स म्हणाले. हा संघर्ष असा आहे की, ज्यामध्ये अमेरिकेचा थेट संबंध नाही. अमेरिका ही परिस्थिती नियंत्रित करण्याच्या स्थितीत नाही आणि अमेरिकेचा या संघर्षाशी काहीही संबंध नाही असे म्हणत युद्धाच्या मध्ये अमेरिका पडणार नाही, असा पुनरुच्चार



त्यांनी केला. आम्ही राजनैतिक मार्गांनी या प्रकरणाचा पाठपुरावा करणार आहोत, असे व्हेन्स म्हणाले. आण्विक संघर्षात रुपांतर होऊ नये ही आशा आम्हाला दोन्ही देशांमधील सुरू असलेला तणाव लवकरात लवकर कमी करायचा आहे. आम्ही युद्धामध्ये अडकणार नाही, आमचा त्यात काही संबंध नाही, असे व्हेन्स म्हणाले. हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील मामला आहे.मात्र हे एका व्यापक प्रादेशिक युद्धात किंवा आण्विक संघर्षात रूपांतरित होणार नाही अशी आम्हाला आशा आहे. अणुऊर्जाधारित देशांमधील तणावाबद्दल आपल्याला नेहमीच काळजी वाटते, असेही व्हेन्स यांनी नमूद केलं. आम्ही भारत-पाकिस्तानला कंट्रोल करू शकत नाही अमेरिका या देशांवर नियंत्रण ठेवू शकत नाही, आम्ही फक्त त्यांना तणाव कमी करण्यास सांगू शकतो, असे अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींनी सांगितले. अमेरिका ही भारत किंवा पाकिस्तानला शस्त्रे टाकण्यास सांगू शकत नाही. पण राजनैतिक पद्धतीने हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू. या तणावाचे रूपांतर मोठ्या प्रादेशिक युद्धात होणार नाही आणि त्यामुळे अणुयुद्ध होणार नाही, अशी आशा आहे. अमेरिकेला हा वाद लवकरात लवकर सोडवायचा आहे. प्रादेशिक स्थिरता केवळ दक्षिण आशियासाठीच नाही तर जागतिक शांततेसाठी देखील महत्त्वाची आहे, परंतु त्याचे निराकरण स्थानिक पातळीवरच शोधले पाहिजे, असेही व्हेन्स म्हणाले. भारताचं पाकला चोख प्रत्युत्तर जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने 6-7 मेच्या रात्री ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानविरुद्ध कठोर कारवाई केली. भारतीय सुरक्षा दलांनी पाकिस्तानमधील 9 दहशतवादी तळांवर हवाई हल्ले करून ते उद्ध्वस्त केले. भारताने जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तैयबा आणि हिजबुल मुजाहिदीनच्या दहशतवादी तळांवर हल्ला केला. या कारवाईनंतर पाकिस्तान घाबरला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ९ मे २०२५
https://lokaarambh.com



# बारावीच्या परीक्षेत सुंदरराव सोळंके

## महाविद्यालयाच्या निकालाची उज्वल परंपरा कायम

माजलगाव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या निकाल जाहीर झाला असुन सु ंदरराव स ो ळ ंके महाविद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम ठ ेवली आहे.यामध्ये विज्ञान शाखाचा ९७.२९ टक्के, कला शाखेचा ६७.१७ टक्के, वाणिज्य शाखेचा ९२.९४ टक्के, व्य ा वस ा ि यिक अभ्यासक्रम ६६.२९ टक्के निकाल लागला आहे . बारावीच्या परीक्षेत सु ंदराव स ो ळ ं के महाविद्यालयातील विज्ञान शाखेतुन प्रथम नायबळ अनुप शरद(९०.६७ %), द्वितीय झरेकर दिग्विजय सुरेश (८९.८३% ), तृतीय मु ंदडा रोहन संदीप व रुद्रवार आ ेजस्वीनी सचिन (८७.५० %), कला शाखातुन प्रथम भडके राणी माणिकराव (८१.५० %),द्वितीय बोचरे योगिता दत्तात्रय (७७.६७ %),तृतीय राऊत शुभा ंगी कारभारी (७६.३२%) वाणिज्य शाखाः प्रथम कुरे अंजली प्रल्हाद (८७.५०%), द्वितीय शेजुळ धनश्री उद्धवराव (८६.१७%), तृतीय राऊत पायल सचिन व कोळपे धनश्री शंकर (८१%) तर व्यावसा यिक अभ्यासक्रमः प्रथम कापसे ऋतुजा म धु क र (७५.५०%), द्वितीय पौळ साक्षी सुदाम (७२.३३% ), तृतीय रावले पूजा महादेव (७०.६७%) यांनी यश संपादन केल

# जिवाची वाडी येथे कॉमन सर्विस सेंटरचे उध्दघाटन संपन्न

केज : केज तालुक्यातील जिवाची वाडी येथे केंद्रिय योजनेतुन नाबार्ड पुढाकाराने प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेचे संगणकीकरण प्रकल्पातर्गत महाराष्ट्र शासनाने सहकार खाते मधुन संगणकाचा पूर्ण संच सेवा सहकारी सोसाटी जिवाची वाडी मिळताच संस्थेने कॉमन सर्विस सेंटरचे(उडउ) उध्दघाटन थाटात संपन्न झाले. बीड जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था महादेव शिंदे यांच्या आदेशा वरून केज सहकारी संस्थाचे सहाय्य निबंधक महादेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था केज कार्यालयीन अधीक्षक श्रीमती माल्टी वहावळे यांच्या शुभहस्ते आणि संस्थेचे सहाय्यक सहकारी अधिकारी कोंडीबा मु ंडे यांच्या समवेत कार्यक्रम संपन्न झाला प्रथमता मान्यवरांच्या हस्ते रिबीन फित कापून उद्धाटन करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोसाटीचे सदस्य सत्यनारायण चौरे यांनी करत सांगीतले की,केज तालुक्यातील पहिली संस्था जिवाची वाडीची आहे की कॉमन सर्विस सेंटर चालु करून ग्रामस्थांना अल्पशा अत्यंत कमी दरात ऑनलाईनची कामे करून व विविध दाखले/प्रमाणपत्र उपलब्द करून देण्याचा मानस संस्थेचा असुन सेवा सहकारी सोसाटीचे चेअरमन,बालाप्रसाद श्रीरंगदास भुतडा थांनी विशेष उलखणीय कार्य करत केज तालुक्यात विशिष्ठ वेगळा उपक्रम राबऊन शेतकऱ्यांचा अर्थीक भार कमी केलेने ग्रामस्त व तालुका परीसरात चर्चा होत आहे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सोसायटीचे जेष्ठ संचालक तुळशीराम तोंडे होते कार्यक्रमास संजय कुटे,दिपक काळे गोकुळ सारूक,राजेंद्र तांदळे,सुभाष सारूक,चांगदेव चौरे,संगणक चालक नितीन फु ंदे -युवराज चौरे इत्यादी ग्रामस्त मोठया संख्येने उपस्थित होते.

## आज शिवचरित्र व्याख्याते कल्याण

# महाराज काळे यांचे कीर्तन



बीड : कपिलधारवाडी येथे ग्रामदैवत वाघेश्वरी माता देवीच्या कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात आज गुरुवार दि. ८ मे २०२५ रोजी रात्री नऊ ते अकरा या वेळेत सुप्रसिद्ध शिवचरित्र व्याख्याते ह.भ.प कल्याण महाराज काळे यांचे किर्तन सेवा होणार आहे. तरी या श्रवण भक्तीचा सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी व वाघेश्वरी मित्र मंडळ कपिलधारवाडी यांनी केले आहे.

# अर्धमसल्यात शेतात खड्ड्यात पाण्याच्या टाकीत ठेवलेला तब्बल ११ लाखाचा गांजा जप्त



गेवराई : शेतात खड्डा खोदून त्यात पाण्याची टाकी ठेवून त्या टाकीत गांजा असल्याची गोपनिय माहीती गेवराईच्या तलवाडा पोलिसांना मिळताच काल रात्री पोलिसांनी छापा टाकून तब्बल ४७ किलो गांजा आढळून आल्याची माहीती एपीआय सोमनाथ नरके यांनी दिली. गेवराईतील अर्धमसल्यात एकाने शेतात गांजा पुरुन ठ ेवल्याची माहीती तलवाडा पोलीसांना मिळाली होती. त्यानुसार मंगळवारच्या रात्री एपीआय सोमनाथ नरके,फौजदार स्वप्नील कोळी, सुनिल बोडखे, जमादार नारायण काकडे, गोपनिय शाखेचे विठ्ठल चव्हाण यांनी अर्धमसल्यात जाऊन तब्बल ११ लाख ६७ हजारांहून ३०० रुपयाचा ४७ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. आरोपी गफार अमिन पठाण(रा.हिरापुर ता.गेवराई) याच्याविरुद्ध तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# आज शेत-पाणंद रस्ते अतिक्रमण मुक्तीसाठी सस्ती अदालतीचे आयोजन

## प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी सस्ती अदालत

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : शेतरस्ते व पाणंदरस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासाठी आज ९-मे रोजी नांदेड जिल्ह्यात सर्व तहसील कार्यालय किंवा मंडळ मुख्यालय ठिकाणी सस्ती अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील गरजू शेतकऱ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिह्ला प्रशासनाने केले आहे. राज्यात जे शेतरस्ते, पाणंदरस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होवून तक्रारी होतात. यामुळे राज्यातील सर्व शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करुन त्यांची कामे दर्जेदाररित्या पूर्ण करण्यात येणार आहेत. हे शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. अशा रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत, असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यातील गरजू नागरिक शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी तसेच जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी तहसिल कार्यालयात किंवा मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी सस्ती अदालत उपक्रम राबविण्यात येणार आहे. यात पाणंद अतिक्रमित रस्त्यांबाबतचे प्रलंबीत प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत. आज शुक्रवार ९- मे रोजी नांदेड जिह्लयातील सर्व तहसिल कार्यालय स्तरावर, मंडळ अधिकारी स्तरावर सस्ती अदालत उपक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिह्ला प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# शहरातील हातपंप इलेक्ट्रॉनिक पंप तत्काळ दुरुस्त करा : खमरोदिन

बीड : बीड शहरात पाण्याची तीव्र त्यांच्याही निर्माण झाली असून नागरिकाची पाण्यासाठी भटकंती सुरू आहे. यावर मत करण्यासाठी हात पंप व इलेक्ट्रॉनिक पंप तत्काळ दुरुस्त करावेत अशी मागणी बीड जिल्हा काँग्र ेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे माजी शहराध्यक्ष मोहम्मद खमरोदिन यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे. मुख्य अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात मोहम्मद खमरोद्दीन यांनी म्हटले आहे की सध्या बीड शहरात मध्ये प्रमाणात पाणी टंचाई असून पाणी पुरवठा २० ते२५ दिवसा आड व कमी दबाने होत आहे. उन्हाची तीव्रता दिवसे दिवस वाढत चालली असून पाण्याची टंचाई निर्माण होऊ लागल्याने महिलांना ठिकठिकाणी पाण्यासाठी भटकती करावी लागत आहे. हेच वास्तव समोर ठ ेवून शहरातील हात पंप व इलेक्ट्रॉनिक पंप हे मोठ्या प्रमाणात नादुरुस्त आहेत. ते बंद असल्याने नागरिकाच्या अडचणी अधिक भर पडली आहे. न प प्रशासनाकड े वेळोवेळी तक्रारी अर्ज निवेदने देऊन ही हात पंप दुरुस्त करण्यास अनास्था दिसून येत आहे.

# पालवण चौक पाण्याच्या टाकीवर पंकज धांडेचे शोले स्टाईल आदोलन

बीड : सरकार बदलले पालकमंत्री बदलले परंतु अद्या बीड शहर पाण्याचा प्रश्न टांगणीलाच आहे. शहरात सर्वत्र नागरिकांचा आक्रोश व्यक्त केला जातोय. दुष्काळाच्या तीव्र झळा सुरू असतानाच बीड शहराला पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन ही खराब झाली असल्याने गेल्या ३३ दिवसापासून बीड शहराला पाणी आलेले नाही. त्यामुळे येथील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. गेल्या काही दिवसापासून पाण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे आंदोलनेही करण्यात आले आहेत. परंतू प्रशासनाला याची जाग आल्याचे दिसून येत नाही. मंगळवारी रात्री ७ ते १२पंकज धांडे, अविनाश कांबळे, अक्षय दळवी यांच्यासह काही युवक पालवन चौक येथील पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले. अखेर रात्री ११ वाजता टाकीत पाणी पडले. राष्ट्र वादी काँग्र ेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पुढाकार घेतल्यानंतर पाणीपुरवठा इंजिनीयर माने व शिवाजी नगर पोलिसांनी त्यांनी समजूत काढून त्यांचे आंदोलन स्थगित केले. बीड शहराला गेल्या ३३ दिवसापासून नळाला पाणी आलेले नाही. त्यामुळे शहरभर नागरीकांचे हाल होताना दिसत आहे. तर गेली वीस वर्षापासून वीस दिवसाला पाणी सोडले जाते. लाईट बिल अभावी नागरिकांना पाणी मिळत नाही ही समस्या पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर मांडली परंतु अजितदादा पवार यांनी अध्याप यावर तोडगा काढलेला नाही. नाव मोठा आणि लक्ष्मी खोटं या मनीप्रमाणे अजित दादांनी या प्रश्नाकडे डोळे झाक केल्यामुळे बिडकारांचे प्रचंड हाल होत आहेत. पालवन चौक येथील युवकांनी पाण्याच्या टाकीवर चढून युवकांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या युवकांचे नागरिकाकडून कौतुक केले जात आहे. सांताग्रस्त नागरिक अशाच प्रकारे पुढे येऊन प्रत्येक वार्डात आंदोलन होऊ शकते. महिला नागरिक प्रशासना समोर आपली व्यथा मांडण्यासाठी मोर्चे काढून आपल्या भावना व्यक्त करू शकतात. बिडकारांच्या सहनशीलतेचा अंत न पाहता पालकमंत्री अजित दादा पवार यांनी या प्रश्नाला प्रथम प्राधान्य देऊन तातडीने हा प्रश्न सोडवला पाहिजे व बीडकरांना नियमित पाणीपुरवठा केला पाहिजे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# रजा हवी तर आठवड्याच्या कामाचा अहवाल सादर करा : पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत



बीड : जिल्हा पोलिस दलात शिस्तीसह कामाचा वेग वाढविण्यासाठी पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी आता रजेचा अर्ज करताना आठवडाभरातील कामाचा आढावा सोबत जोडण्याचा निर्णय घेतला आहे. मागील कामाचा अहवाल पाहूनच रजेचा निर्णय घेतला जाणार आहे. अधिकारी, कर्मचारी परस्पर ऑनलाईन यंत्रणेत रजेचा अर्ज टाकून रजेवर निघून जातात. अनेकदा प्रमुख घटनांचा तपास, कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा उपस्थित झालेला असतानाही संबंधित अधिकरी व कर्मचारी रजेवर निघून गेलेले असतात. यावर आता पोलिस अधीक्षकांनी कामाच्या आढाव्याचा नियम काढला आहे. आठवडाभरात काय काम केले याचा अहवाल जोडून देणे आवश्यक असल्याचे आणि त्याचे मूल्यमापन करूनच रजा मंजुरीचा निर्णय होणार आहे. पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीड जिल्हा पोलिस दलाची प्रतिमा बदलण्यासाठी नवनव्या संकल्पना मांडल्या आहेत. आता पोलिस दलातील शिस्तीसाठी हा प्रयोग हाती घेण्यात आला आहे. पोलिस खात्यातील अनेकजण व्हॉट्सअपवर रजा टाकून रजा मंजुरीची वाट न पाहताही रजेवर जात असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे मनासारखे होत नसेल तर किंवा जवळच्या एखाद्यावरील कारवाई टाळायची असेल तरी अधिकारी रजेवर निघून जातात. त्यामुळे रजा घेण्यासाठी कॉवत यांनी रजेच्या अर्जासोबत मागच्या आठवड्यातील कामाचा गोषवारा सक्तीचा केला आहे. त्या गोषवाऱ्याचे मूल्यमापन करूनच कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या रजेचा निर्णय होणार असल्याचे पोलीस अधीक्षकांनी म्हटले आहे. यामुळे रजेच्या बाबतीतल्या मनमानीला निश्चितपणे चाप बसणार आहे. महत्वाची घटना, कायदा सुव्यवस्थेच्या काळात पोलिसांची जबाबदारी असते. त्यामुळे रजा मंजुरीपूर्वी कामाचे मुल्यमापन केले जाणार आहे. एखाद्या कर्मचाऱ्याचे अत्यावश्यक, सुख दुःखाचे काम असेल तरच मुल्यमापनाशिवाय देखील रजा दिली जाईल असे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी सांगितल

# शरद पवार अजित पवार एकत्र येणार!

## शरद पवार यांचे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एकजुटीचे संकेत

मु ंबई : राष्ट्रवादी काँग्र ेस पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी दिलेल्या विशेष मुलाखतीत पक्षाच्या अंतर्गत राजकारणावर भाष्य करत मोठा खुलासा केला आहे. पक्षातील एक गट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील एनसीपी मध्ये सामील होण्याच्या मनस्थितीत असल्याचे त्यांनी सांगितले. यासोबतच, पक्षाने सत्तेत सहभागी व्हायचे की विरोधी बाकांवर राहायचे, हा निर्णय खासदार सुप्रिया सुळे यांनी घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. शरद पवार यांनी म्हटले, पक्षातील काही नेते आणि कार्यकर्ते अजित पवार यांच्यासोबत जाण्यास उत्सुक आहेत. हे राजकीय गणित आहे, पण अंतिम निर्णय सुप्रिया सुळे यांनी घ्यावा. त्यांच्यावर पक्षाच्या भवितव्याची मोठी जबाबदारी आहे. यामुळे एनसीपी मधील



अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. अजित पवार यांनी जुलै २०२३ मध्ये पक्षात फूट

पाडू न ४० आमदारांसह भाजपा शिवसेना युतीत प्रवेश केला होता. त्यानंतर छउझ-डझ आणि छउझ असे दोन गट निर्माण झाले. सुप्रिया सुळे यांनी यापूर्वी अजित पवार या ंच्यासो बतच्या विलीनीकरणाच्या चर्चांना फारसे महत्त्व दिलेले नाही. मात्र, शरद पवार यांच्या या वक्तव्यानंतर त्यांच्यावर पक्षाच्या धोरणात्मक निर्णयाची जबाबदारी येऊन पडली आहे. महाराष्ट्राच्या हितासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे सुळे यांनी यापूर्वी म्हटले होते. पण पक्षीय एकीकरणाबाबत त्यांनी ठोस भूमिका घेतलेली नाही. शरद पवार यांचे हे वक्तव्य आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षातील एकजुटीचे संकेत देणारे असू शकते. मात्र, सुप्रिया सुळे सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतील की विरोधक म्हणून लढतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदिस्त पुतळा बाहेर काढून स्थापन करा-मराठा मावळा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
किनवट : येथील छत्रपती शिवाजी म हाराजांचा बंदिस्त असलेला पुतळा त्वरित काढून सन्मानाने स्मारक बांधावे या म ागणीसाठी मराठा मावळा संघटनेच्या वतीने बेमुदत साखळी उपोषणाला ५-मे पासून सुरुवात करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरूड पुतळा नगर परिषद सत्ताधाऱ्यांनी वाजत गाजत आणून किमान दोन वर्षाचा काळ लोटला असून अद्यापही छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक झालेले नाही पुतळा आणून नगरपरिषदेच्या देखभालीखाली बंदिस्त ठेवला असून पुतळा स्थापन करण्यासाठी अनेकदा निवेदने आंदोलने उपोषणे विविध संघटनेने पाठपुरावा करून सुद्धा नगरपरिषदेने व सत्ताधाऱ्यांनी त्याकडे कानाडोळा करत अद्याप पर्यंत पुतळा स्थापन केला नसून आता मावळा मराठा संघटनेने यात लक्ष घालून ५- मे पासून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदिस्त असलेला पुतळा त्वरित बाहेर काढून स्म ारक बांधावे असे नगरपरिषदेला ठणकावून सांगितले असून जोपर्यंत पुतळा स्थापन होत नाही तोपर्यंत आम्ही साखळी उपोषण चालूच ठेवणार असल्याचे मावळा संघटनेतून सांगण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदिस्त असलेला पुतळा काढून लवकरात लवकर स्मारक उभारावे या मागणीसाठी साखळी उपोषणास बसत असल्याबाबत मराठा मावळा संघटनेच्या वतीने नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.या निवेदनावर संतोष चव्हाण अमोल कदम वैभव सूर्यवंशी यांच्या साक्षऱ्या आहेत.

मावळा संघटनेच्या साखळी उपोषणास




साहेबराव पवार,संभाजी ब्रिगेडचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बालाजी पाटील सिरसाट तालुकाध्यक्ष सचिन पाटील कदम,गोविंद आरसोड, सुमित माने,गोविंद देवडे यांच्यासह अनेक संघटनानी व शिवभक्तांनी उपोषण स्थळी भेटी दिल्या.

# अपात्र शिक्षक परमेश्वर नेपते यांची बोगस नियुक्ती

## जिल्हा परिषदशिक्षण विभागकडे तक्रार; चौकशीची मागणी

धारूर / प्रतिनिधी
जिल्हा परिषद बीड अंतर्गत किल्ले धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जामदेव वस्ती केंद्र अंजनडोह तालुका धारूर जिल्हा बीड येथील शिक्षक परमेश्वर लिंबाजी नेपते शिक्षक म्हणून कार्यरत आहेत संबंधित शिक्षक कर्मचाऱ्यांनी विषयांकित शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले असून सदरील शासन निर्णयाप्रमाणे शासनापासून माहिती लपून ठेवून संबंधित कर्मचारी शासकीय सेवेचा इतर मिळणाऱ्या शासकीय लाभांचा लाभ घेत आहे संबंधित कर्मचाऱ्यास दि.०८/०३/ २००५ नंतर तिसरे अपत्य झालेले असल्याकारणाने व शासनापासून माहिती लपून ठेवून शासकीय सेवेचा लाभ घेत आहेत संबंधित आपत्याचे जन्म दिनांक पुढील प्रमाणे
निकिता परमेश्वर नेपते यांचा जन्म दि.०२/०४/२००२
तर राहुल परमेश्वर नेपते यांचा जन्म दि.१५/०९/२००५ जन्म
अंजली परमेश्वर नेपते यांचा जन्म २५/०७/२००६ असून
याप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांच्या आपत्याच्या जन्मतारखा आहेत तरी शासन निर्णयानुसार सखोल चौकशी करून शासनाची फसवणूक करणे माहिती लपवून ठेवणे व शासकीय लाभ घेणे या सर्व बाबींचा विचार करता संबंधित कर्मचाऱ्यांचे वर्तन हे जिल्हा परिषद कर्मचारी व दिनांक २८ /०३/ २००५ च्या शासन निर्णयाला हरताळ फासण्याचे काम करत आहे.

या अपात्र शिक्षक असलेल्या परमेश्वर नेपते यांची बोगस नियुक्ती असून तात्काळ चौकशी करण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागकडे तक्रार रोहन नखाते यांनी केली असून

तरी संबंधित कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी नखाते यांनी केली असून अन्यथा १६/ ०५/ २०२५ रोजी जिल्हा परिषद कार्यालय बीड येथे अमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा रोहन नखाते यांनी दिला आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शुक्रवार ९ मे २०२५
https://lokaarambh.com



# पाकिस्तानला मोठा झटका, दोन JF- १७, एक F-१६ पाडल



पाकिस्तानने पुन्हा एकदा हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे दोन JF- 17 आणि F-16 फायटर जेट पाडल्याची माहिती आहे. पाकिस्तानने काल रात्री भारताच्या 15 शहरांवर मिसाईल आणि ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला होता. पण हा प्रयत्न भारताने यशस्वी होऊ दिला नाही. S-400 एअर डिफेन्स सिस्टिमने पाकिस्तान हवाई हल्ला परतवून लावला. त्यानंतर पाकिस्तानने पुन्हा एकदा जम्मूमध्ये ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न सुद्धा भारताच्या सैन्यदलाने यशस्वी होऊ दिलेला नाही. पाकिस्तानने डागलेली ड्रोन आणि मिसाईल्स हवेतच नष्ट करण्यात आली आहेत. भारतीय एअर डिफेंस सिस्टिमने जम्मू, जैसलमेर आणि अमृतसर येथे पाकिस्तानचे हल्ले अयशस्वी केले आहेत. एअर डिफेन्स सिस्टिमसह एअर डिफेन्स गनने सुद्धा जम्मूत कमी उंचीवरुन उड्डणाऱ्या ड्रोन्सना नष्ट केलं. जम्मूचा सतवारी एअरपोर्ट, जम्मू यूनिवर्सिटी टार्गेट करण्यासाठी पाकिस्तानने ड्रोन्स डागली होती. पण त्यांना अँटी ड्रोन सिस्टिमद्वारे नष्ट करण्यात आलं आहे. जम्मू काश्मीर सरकारकडून अलर्ट जारी करण्यात आला आहे. घरातील कोणत्याही लाइट चालू करु नका. वाहनांची रस्त्यावरील हालचाल थांबवा. घराबाहेर पडू नका, असं जम्मू काश्मीर सरकारकडून आवाहन करण्यात आलं आहे. एअरस्ट्रिपवर रॉकेट डागण्याचा प्रयत्न पंजाबच्या बॉर्डर भागा ब्लॅकआऊट करण्यात आला आहे. अमृतसरमध्ये रात्री 9 ते सकाळी 5 वाजेपर्यंत ब्लॅकआऊट असणार आहे. पाकिस्तानने गुरुवारी जम्मू येथील एअरस्ट्रिपवर रॉकेट डागले. पण भारतीय सैन्याची सतर्कता आणि ताकतवर एअर डिफेन्स प्रणालीने पाकिस्तानचा हा हल्ला यशस्वी होऊ दिला नाही. 8 मिसाईल्स हवेतच नष्ट भारतीय सैन्याच्या अत्याधुनिक S-400 मिसाइल डिफेंस सिस्टिमने पाकिस्तानकडून डागण्यात आलेली 8 मिसाईल्स हवेतच नष्ट केली. जम्मू एअरस्ट्रिप या मिसाईल्सच लक्ष्य होतं. पण वेळीच कारवाई करुन पाकिस्तानचा हल्ला परतवून लावला. सैन्य पूर्णपणे सज्ज भारतीय सैन्याच्या एअर डिफेंस यूनिट्ने पाकिस्तानच F-16 फायटर जेट पाडलं आहे. नियंत्रण रेषेजवळ ही कारवाई केली आहे. पाकिस्तानी जेट भारतीय हवाई हद्दीत घुसण्याचा प्रयत्न करताच ते विमान पाडण्यात आलं.

## मालेगाव खटल्याच्या निकालापूर्वी साध्वी प्रज्ञा सिंह यांची एका वाक्यात प्रतिक्रिया:निकालाबाबत कोर्टात काय घडले?

मालेगावमध्ये २००८ साली झालेल्या स्फोटाच्या खटल्याचा निकाल तब्बल १७ वर्षांनी गुरूवारी ८ मे रोजी जाहीर होणार होता. यापूर्वी, १९ एप्रिल रोजी मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एनआयए कोर्टाने निकाल राखून ठेवला होता. परंतु आजही निकाल देण्यात आला नाही. निकालासाठी पुढील तारीख दिली गेली आहे. या निकालाबाबत बॉम्बस्फोट खटाल्यातील आरोपी स्वाध्वी प्रज्ञा यांनी एका ओळीत प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी आपला 'सत्यमेव जयते'वर पूर्ण विश्वास आहे, असे म्हटले आहे. मालेगावातील एका धार्मिक स्थळाबाहेर २००८ मध्ये बॉम्बस्फोट झाला होता. या स्फोटात ६ लोकांचा मृत्यू झाला होता. तसेच १०१ जण जखमी झाले होते. या स्फोटाच्या खटल्याचा



निकाल तब्बल १७ वर्षांनी गुरूवारी येणार होता. १ लाखापेक्षा जास्त पाने असल्याने अभ्यास करायला वेळ लागणार आहे. त्यामुळे या खटल्याचा निकालासाठी आता ३१ जुलैची पुढील तारीख देण्यात आली आहे. आतापर्यंत कोर्टात या प्रकरणात आरोपी साध्वी प्रज्ञा, समीर कुलकर्णी, रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर चतुर्वेदी, सुधाकर दिव्वेदी यांच्यावर आरोपपत्र दाखल झाले आहे. निकालाच्या पूर्वी साध्वी प्रज्ञा यांनी सांगितले की, कोणावर अन्याय होणार नाही, अशी मला अशा आहे. माझा सत्यमेव जयतेवर पूर्ण विश्वास आहे. देशात देशभक्त राहिला पाहिजे, गद्दार नाही. पूजा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. मात्र, त्यात अडथळा आणणे हक्क नाही. काँग्रेसने शहीद जवानांचा नेहमी अपमान केला. मात्र, भाजपने शहीद जवानांना सन्मान दिला आहे. नवीन भारत नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह यांचा आहे. या भारतामध्ये आम्ही कोणाला छेडत नाही आणि आम्हाला छेडल तर त्याला सोडत नाही. मालेगाव खटल्याची पार्श्वभूमी अशी मालेगाव शहरात २००८ साली झालेल्या बॉम्बस्फोटाच्या खटला एनआयए कोर्टाचे न्यायाधीश एल. के. लाहोटी यांच्यासमोर सुरु आहे. या खटल्यात सरकारी वकिलांनी ३२३ साक्षीदारांचे साक्षीपुरावे नोंदवले आहे. त्यापैकी ३४ साक्षीदार फितूर झाले आहेत. या खटल्यात साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी उर्फ स्वामी अमृतानंद, सुधाकर चुतर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांच्याविरोधात हत्येशी संबंधित दहशतवाद विरोधी कायदा आणि युएपीए अंतर्गत खटला चालला. या खटल्यात श्याम साहु, प्रवीण टकल्की, रामजी कालसंग्रा आणि संदीप डांगे हे आरोपी फरार घोषित करण्यात आले

## एरीया वेल्फेअर ऑफिसर पाटील आणि कविराज देवळेकर यांचा सत्कार !!


अन्टोप हिल येथे केंद्रीय कर्मचारी १ते६ वसाहती येथील सेंट्रल सी पी डब्ल्यु डी मजदूर युनियन तर्फे कार्यालयात सुरुवातीला कमलाकर कांबळे यांनी प्रस्तावना व सुत्रसंचलन केले. दत्तराज पाटील हे एरीया वेल्फेअर ऑफिसर म्हणून दिल्ली नियुक्त झाल्याबद्दल कॉ. पंडित देसाई यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. तसेच आयकर विभागातून निवृत्त झालेले जेष्ठ कवी विलास देवळेकर यांचा आयकर विभाग स्थानीय लोकाधिकार समिती सचिव मुकूंद परब यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. पाटील यांनी आपल्या AWO पदाची माहिती देताना, सत्काराला उत्तर देताना सांगितले की, आपण आपल्या काही सूचना- समस्या असतील, त्या लेखी स्वरूपात द्या, आपले समाधान करण्याचा मी प्रयत्न करतो. आणि कविराज देवळेकर यांनी पाटील यांच्या नावाने कविता इको साऊंड म्युझिकल सिस्टीम मध्ये सादर केली. सर्व उपस्थितांना अल्पोपहार वाटप करण्यात आले. आणि ह्या कार्यक्रमाचे आयोजक व नियोजनबद्ध सुनील प्रभू यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. परंतू एरव्ही ऊठसुठ टीव्हीवर चमकणारे पाकचे सैन्य प्रमुख असीम मुनीर यांनी कोणतीही प्रतिक्रीया दिलेली नाही हे विशेष... जनरल मुनीर चिडीचूपजनरल असीम मुनीर यांच्या मौनामागे काही त्यांना सैन्यातून समर्थन मिळत नसल्याचे म्हटले जात आहे. रिटायर्ड मेजर जनरल राजन कोचर यांनी यासंदर्भात मत मांडताना सांगितले की पाकिस्तानी सैन्यातील अनेक महत्वाचे अधिकारी मुनीर यांच्या नेतृत्वावर नाराज आहेत.

## पाकिस्तानला भारताचा आणखी एक दणका!

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने देशात पाकिस्तानी चित्रपट, गाणी, पॉडकास्ट आणि वेब-सिरीज यासारख्या कोणत्याही कन्टेन्टचे प्रदर्शन तात्काळ बंदी घातली आहे. हा आदेश सर्व ओटीटी आणि मीडिया स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर लागू होईल. त्यामुळे पाकिस्तानला हा आणखी एक दणका भारताने दिला आहे. हा आदेश माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ अंतर्गत जारी करण्यात आला आहे. मंत्रालयाने स्पष्ट केले की पाकिस्तानशी संबंधित कोणताही मजकूर प्रसारित केल्याने देशाच्या सार्वभौमत्वाला, सुरक्षिततेला आणि परदेशांशी असलेल्या मैत्रीपूर्ण संबंधांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे, सर्व ओटीटी प्लॅटफॉर्म, मीडिया स्ट्रीमिंग सेवा आणि मध्यस्थांना भारतात असा कोणताही कंटेंट दाखवणे थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## अमेरिकेला जे जमलं नाही ते भारतानं करून दाखवलं, ऑपरेशन सिंदूर अन अजित डोभाल यांची २६ वर्षांपूर्वीची ती भीष्म प्रतिज्ञा पूर्ण


भारतानं पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राईक केला, या हल्ल्यामध्ये पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधील तब्बल 9 दहशतवादी ठिकाणं उद्ध्वस्त करण्यात आली आहेत, या हल्ल्यामध्ये शंभर पेक्षा अधिक दहशतवादी मारले गेले आहेत, भारतानं अनेक वर्षांपासूनचा पाकिस्तानसोबतचा आपला हिशोब चुकता केला आहे. याचबरोबर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांची ती प्रतिज्ञा देखील पूर्ण झाली आहे. 24 डिसेंबर 1999 ला घडलेली कंधार विमान हायजॅकची घटना तुम्हाला आठवतच असेल, दहशतवाद्यांनी 24 डिसेंबर 1999 रोजी काठमांडूहून लखनऊला येणाऱ्या विमानाचं अपहरण केलं होतं. त्यानंतर हे विमान कंधारला नेण्यात आलं. या विमानात 176 प्रवासी, पायलट आणि 15 क्रू मेंबर्स होते. विमान सोडण्याच्या बदल्यात दहशतवाद्यांनी भारतीय तुरुंगात असलेल्या मसूद अझहर याच्या सुटकेची मागणी केली होती. मात्र तेव्हा प्रवाशांना वाचवण्याचा दुसरा कोणताच मार्ग दिसत नसल्यानं मसूद अझहर याला मुक्त करावं



लागलं, परंतु तेव्हाच अजित डोभाल यांनी या प्रकरणातील दहशतवाद्यांना मारण्याची प्रतिज्ञा केली होती, अखेर 26 वर्षांनंतर अजित डोभाल यांची ही प्रतिज्ञा पूर्ण झाली आहे. कंधार विमान अपहरणाचा मास्टरमाइंड रौफ अझहर हा ऑपरेशन सिंदूरमध्ये मारला गेला आहे. रौफ अझहर हा जैश -ए मोहम्मदचा आका मसूद अझहरचा छोटा भाऊ होता, मुंबईवर झालेला 26/11 चा हल्ला, संसद भवनावर झालेला हल्ला, तसेच पठानकोट हल्ला अशा अनेक दहशतवादी कारवायांमध्ये त्याचा सहभाग होता. भारताकडून त्याचा शोध सुरू होता, अमेरिकेला देखील तो हवा होता. कारण अमेरिकन प्रवाशी असलेल्या डेनयिल पर्ल याला मारण्यामध्ये त्याचाच हात असल्याचं समोर आलं होतं, अमेरिका तर त्याला शोधू शकली नाही, मात्र भारतानं मंगळवारी केलेल्या कारवाईमध्ये त्याचा मृत्यू झाला, अजित डोभाल यांची 26 वर्षांपूर्वीची ती प्रतिज्ञा अखेर पूर्ण झाली आहे. पाकिस्तानच्या उलट्या बोंबा दरम्यान भारताच्या या एअर स्ट्राईकनंतर आता पाकिस्तानकडून उलटा दावा करण्यात येत आहे. भारतानं जिथे हल्ला केला तिथे दहशतवादी अड्डे नव्हतेच असं पाकिस्तानने म्हटलं आहे.

# भारत-पाकिस्तान सीमेवर तणाव वाढला, मुंबईतील सिद्धिविनायक मंदिराचा मोठा निर्णय

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने पाकिस्तानवर 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत जोरदार एअरस्ट्राईक केला. यात पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे ९ तळ उद्ध्वस्त करण्यात आले. यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. यानंतर बिथरलेल्या पाकिस्तानने भारताच्या १५ शहरांवर हवाई हल्ल्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय हवाई दलाने तो हाणून पाडला. त्यानंतर भारताने प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानच्या लाहोरमधील एअर डिफेन्स आणि रडार सिस्टीम ड्रोन हल्ल्यांद्वारे उद्ध्वस्त केली. या पार्श्वभूमीवर सध्या भारतातील महत्त्वाच्या शहरांमध्ये तसेच सीमालगत भागात सावधगिरी बाळगली जात आहे. भारत-पाकिस्तानात सध्या सुरु असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर देशभरात सतर्कता बाळगली जात आहे. याचाच भाग म्हणून मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिराने मोठा निर्णय घेतला आहे. मंदिर प्रशासनाने सुरक्षेच्या कारणास्तव येत्या रविवारपासून भाविकांना हार आणि नारळ अर्पण करण्यास मनाई केली आहे. भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावामुळे खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.





याबाबत अधिकृत माहिती मंदिर प्रशासनाकडून लवकरच प्रसिद्ध केली जाणार आहे. या निर्णयाला भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर प्रशासनाकडून करण्यात आले आहे. सध्याची परिस्थिती पाहता भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे, त्यामुळे हा बदल करण्यात आला आहे. काश्मीरमधील शाळा बंद पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले. भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या ९ तळांवर एअर स्ट्राईक करून ते उद्ध्वस्त केले. या कारवाईत १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. यानंतर पाकिस्तानने भारताच्या १५ शहरांमधील लष्करी ठिकाणांवर हवाई हल्ल्याचा प्रयत्न केला, मात्र याला भारतीय हवाई दलाने चोख प्रत्युत्तर देत हवेतच उद्ध्वस्त केले. यानंतर भारताने आक्रमक पवित्रा घेत पाकिस्तानच्या लाहोरमधील एअर डिफेन्स सिस्टीम आणि रडार सिस्टीम ड्रोन हल्ल्यांच्या माध्यमातून उद्ध्वस्त केली. पाकिस्तानकडून वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जात आहे. सीमेपलीकडून जम्मू-काश्मीरमधील नागरी वस्त्यांवर लक्ष्य साधले जात आहे. या पार्श्वभूमीवर काश्मीरमधील बारामूला आणि कुपवाडा जिल्ह्यातील सर्व सरकारी आणि खाजगी शाळा तसेच श्रीनगर आणि अवंतीपोरा विमानतळाजवळील शाळा ९ आणि १० मे रोजी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com